B.Sc.-I / B.Sc. (I.T.) / B.C.A.(Sci) / B.Com. (with Credits)-Regular-Semester 2012 Sem I

**1002 / 1BIT2M / 1BCA2M / 0217 Compulsory Marathi आवश्यक मराठी**

P. Pages : 2 **GUG/W/16/3268C**

Time : Three Hours * 4 9 6 0 * Max. Marks : 80

---

**1.** ''आपल्या समाजात शिक्षण फैलावले पाहिजे व लिहिणे, बोलणे हे व्यवसाय जे एकाच वर्गाकडे आहेत ते सर्व वर्गात फैलावले पाहिजेत'' असे श्री. म. माटे का म्हणतात? **16**

**किंवा**

एक राष्ट्र एक जनता हे दृश्य पुन्हा कोणत्या गोष्टींमुळे दिसू लागेल, असे वि. भि. कोलते यांना वाटते?

**2.** ज्ञानदेवांनी 'पसायदानातून' विश्वकल्याणाची अलोट सदिच्छा कशाप्रकारे व्यक्त केली आहे? **16**

**किंवा**

केशवसुतांनी 'नवा शिपाई' या कवितेतून विश्वबंधुत्वाचा विचार कसा व्यक्त केला आहे?

**3.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दात लिहा. **16**

**गट - 'अ'**

क) गाडगेबाबांनी त्यांच्या कीर्तनात सांगितलेली उकंड्याची कहाणी आपल्या शब्दात सांगा.

ख) बाबा आमटे यांनी तरूणांकडून कोणती अपेक्षा व्यक्त केली आहे?

ग) 'टवाळा आवडे विनोद' या समर्थांच्या उक्तीमुळे समाजावर कोणता परिणाम झाला?

घ) नैसर्गिक चमत्कृतीचे कारण दैवी असावे असे मानण्याची मानवी प्रवृत्ती कां असते?

**किंवा**

**गट - 'ब'**

च) 'तो फाटका माणूस माझ्यावर चेटूक करून जाई' असे मधुकर केचे का म्हणतात?

छ) बाबा आमटे 'मनाचा महारोगी' कोणास समजतात?

ज) ''विनोदाच्या देणगीबददल आपण इंग्रजांचे निः संशय कायमचे ऋणी राहिले पाहिजे'' असे डॉ. अ. वा. वर्टी का म्हणतात?

झ) विज्ञानातील 'प्रयोग - निरीक्षण - निष्कर्ष' पध्दत कशी चालते?

**4.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दात लिहा. **16**

**गट - 'क'**

त) अनंत फंदी यांनी संसारी माणसाला कोणता उपदेश केला आहे?

थ) पृथ्वीचे लक्ष आपल्याकडे वेधण्यासाठी कोणकोणते ग्रह तारे प्रयत्न करतात?

द) कोणाच्या दहनभूमिवर चिरा पणती नसल्याची खंत बा. भ. बोरकर व्यक्त करतात?

ध) पृथ्वीमाता हरेकाची मातृभूमी केंव्हा होईल?

**किंवा**

**गट - 'ड'**

प) 'भली भलाई कर काही, पण अधर्म मार्गी शिरू नको' असे अनंत फंदी का म्हणतात?

फ) 'नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा तुझी दूरता त्याहुनी साहवे,' असे पृथ्वी सूर्याला का म्हणते?

ब) सांसारिक जीवनातील 'स्त्री' चे महत्व कवी बा. भ. बोरकरांनी कसे स्पष्ट केले आहे?

भ) जवानांच्या खांद्यावरील बंदुकीचे वखर - नांगर होतील तर काय होईल?

**5.** पुढील सर्व प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. **16**

1) गाडगेबाबांनी लोकांना व्यसनापासून, अज्ञानापासून कशाप्रकारे मुक्त केले?

2) विज्ञानाच्या गैरवापराबदद्ल जयंत नारळीकरांनी काय सांगितले आहे?

3) ''बरी खुशामत शहाण्याची ही मुर्खाची ती मैत्री नको'' असे अनंत फंदी का म्हणतात?

4) भौगोलिक वास्तवाचा यथायोग्य उपयोग कुसुमाग्रजांनी 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत कसा करून घेतला आहे?

************

munotes.in